**8 ते 10 वर्षे**
**वयोगटातील मुलांकरिता**

**नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया**ची स्थापना पुस्तकांचा प्रचार आणि वाचन अभिरुचीचा विकास या उद्देशाने सन 1957 मध्ये भारत सरकारच्या (उच्च शिक्षण विभाग, मनुष्य संसाधन विकास मंत्रालय) द्वारा केली गेली आहे. न्यासद्वारे हिंदी, इंग्रजीसहित 30 पेक्षा अधिक भाषा आणि बोलीमध्ये पुस्तकांचे प्रकाशन केले जाते. लहान मुलांच्या पुस्तकांच्या प्रकाशनास संस्थेतर्फे नेहमीच प्राथमिकता दिली जाते.

ISBN 978 - 81-237-9012-1

पहिली आवृत्ती : 2019 (*शके* 1941)
© देबाशीष मजुमदार
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
A Lesson From Grandma (*English Original*)
Aajichaa Dhadaa (*Marathi*)

₹ **40.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया, फेज–II,
वसंत कुंज, नवी दिल्ली- 110 070 यांनी प्रकाशित केले.

www.nbtindia.gov.in

nbt.india
एकः सूते सकलम्




# आजीचा धडा

देबाशीष मजुमदार

रेखाचित्रे
अलय घोषाल

अनुवाद
निवेदिता मदाने वैशंपायन

nbt.india
एकः सूते सकलम्
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

A Lession From Grandma 13-12-2019.indd 1 13-12-2019 15:32:28



अनिता एक आनंदी चित्रकार होती. तिच्या गावातील चित्रकलेच्या अनेक स्पर्धांत तिने उत्तम यश संपादन केले होते. तिच्या शाळेतील मित्रांना तिच्या लक्षणीय यशाबद्दल नेहमीच तिचा अभिमान वाटत असे.

अनिताने नवी दिल्लीतील चित्रकलेची प्रतिष्ठित स्पर्धा जिंकली तेव्हा तिने तिची बंगलोर येथील मावस बहीण निशा हिला ई-मेल करून आपण संपादित केलेल्या यशाची सविस्तर माहिती दिली.

आठवड्यानंतर निशाने अनिताला उत्तर लिहिले, त्यात स्वतःच्या साहित्यिक लेखन-कलेच्या विशेष कौशल्याबद्दल आणि विविध कथा-स्पर्धांमध्ये तिने मिळविलेल्या बक्षिसांबद्दल सांगितले. तथापि, अनिताच्या उत्तम कलात्मक यशाबद्दल एका शब्दानेही त्यात उल्लेख केला नाही.

nbt.india
एक पुस्तक सौ सौ प्रश्न

A Lession From Grandma 13-12-2019.indd 2
13-12-2019 15:32:29

आता निशा आणि अनिता आपआपसांत नेहमी ई-मेल्स पाठवित असत. परंतु त्यात केवळ आपल्या स्वतःच्या नैपुण्याबद्दल आणि माध्यमांनी त्याबद्दल काय प्रसिद्ध केले आहे एवढेच त्या एकमेकींना कळवित असत.

एकदा वाईट वाटून निशा आपल्या आईला म्हणाली, ‘‘आई, माझ्या लेखन-कौशल्याबद्दल अनिता आपल्या उत्तरात का बरे कौतुक करत नाही?’’

तेव्हा आई म्हणाली, ‘‘तुम्ही दोघीही प्रेमळ बहिणी आहात. आपल्या परिवारातच असलेल्या तुमच्या कलागुणांबद्दल तुम्हा दोघींनाही अभिमान वाटला पहिजे.’’

या दोघींनाही परस्परांच्या कलेबद्दल दाद देण्याची कल्पना कधी स्फुरलीच नाही. त्या दोघीही एकमेकींकडून त्याची अपेक्षा मात्र करीत होत्या.



nbt.india एकः सूते सकलम्



इकडे नवी दिल्लीत अनिताचादेखील निशाबद्दल नेमक्या अशाच भावना होत्या.

एकदा अनिता उसासा टाकत तिच्या आईला म्हणाली, ''निशा आपल्या कुटुंबातील जणू काही माझी स्पर्धकच आहे. माझ्या चित्रकलेच्या विश्वातील यश ती कधीच मान्य करायला तयार होत नाही.''

त्यावर आई म्हणाली, ''तुम्ही असा एकदुसरीचा हेवा करता कामा नये. तुम्ही दोघींनीही स्वतःबद्दल बढाई मारणे बंद करायला हवे. परस्परांना तुम्ही प्रोत्साहित करायला शिकले पाहिजे. यामुळे तुमच्या क्षेत्रातल्या कामगिरीसाठी तुम्हीच एकमेकींना प्रेरणा देऊ शकाल.''

nbt.india एकः सूते सकलम्



अनिताने दुःखद अंतःकरणाने म्हटले, "निशा माझ्याबाबतीत खूप मत्सरी आहे. तिने लेखन-कलेत मिळवलेल्या यशाबद्दल मी कधीच प्रशंसा करणार नाही."

उन्हाळी सुट्टीच्या निमित्ताने निशाने बंगालमधील शांतिपूर येथील आपल्या आजीकडे काही आठवडे तिच्या समवेत राहण्याचे ठरविले.

त्या ग्रामीण भागातील रमणीय दृश्य सुखावह वाटेल असे निशाला वाटले. त्या आनंददायक वातावरणात आपले लेखन-कौशल्य अधिक बहरेल म्हणून तिने आपल्या शालेय वार्षिक मासिकासाठी काही लघु-कथाही लिहिण्याचे ठरविले.

nbt.india एकः सूते सकलम्



निशाला पाहून आजीला खूप आनंद झाला. आजीने निशाला दोन्ही हाताने आलिंगन देऊन तिचे अंतःकरणपूर्वक स्वागत केले. त्याचवेळी तिने एक मोठी चकित करणारी गोष्ट सांगितली.

आजी हसून म्हणाली, ''निशा सांग बरं उद्या कोण येणार आहे?'' न राहून तीच पुढे म्हणाली, ''अनिता येथे येणार आहे आणि तुम्ही दोघी मोठ्या मजेत एकत्रितपणे सुट्टी घालवाल.''

चेहऱ्यावर अनिच्छा दर्शवित निशा आजीला म्हणाली, ''नाही, नाही. अनिता आली माझ्या संपूर्ण सुट्टीचा सत्यानाश होईल. ती इथे येऊ नये हीच माझी शेवटपर्यंत इच्छा असेल...'' हे ऐकून आजीला धक्काच बसला.

nbt.india
एकः सूते सकलम्

आजी म्हणाली, ''हे पाहा, तुमच्या दोघींच्या आई या बहिणी आहेत. त्या जीवनात एकमेकींशी सदैव जीवाभावाने वागत असतात. त्या नेहमीच एकमेकींसाठी त्याग करायला तयार असतात आणि तुम्ही दोघी .... स्वतःच विचार करा, आपण कसे वागतो ते...''

निशा म्हणाली ''आज्ञी, इतक्या लांबून या खेडेगावात मी माझी लिखाणाची आवड जोपासायला .... आणि तुझ्या हातच्या घरगुती लज्ञतदार  स्वयंपाकाचा आस्वाद घेण्यासाठी आले आहे.''

त्यावर आज्ञी म्हणाली, ''अगं अनितालादेखील तुझ्याप्रमाणेच करायचे आहे. त्यासाठीच तर ती मला भेटायला येणार आहे.''



nbt.india
एकः सूते सकलम्



nbt.india
एकः सूते सकलम्

आश्चर्यचकित निशा म्हणाली, ''आजी, काय म्हणतेस तू? तिला माहीत तरी आहे का, मी येथे आहे?''

आजी उत्साहाने म्हणाली, ''अर्थातच! अग अनितानेच तर मला तुझ्या आजवरच्या कौतुकास्पद कामगिरीबद्दल कळविले आहे. आणि खरी गोष्ट ही, की तिला तिच्या बहिणीबद्दल म्हणजे तुझ्याबद्दल खूपच अभिमान आहे.''



nbt.india
एकः सूते सकलम्

निशाला आजी काय म्हणतेय यावर विश्वासच बसत नव्हता. ती म्हणाली, ‘‘खरंच तुला माझ्या लेखन-कलेच्या पारितोषिकांसंबंधी सर्वच माहिती आहे?’’ आजी म्हणाली, ‘‘हो, प्रत्येक गोष्ट! अगदी तुला कालच मिळालेल्या पारितोषिकाबद्दलदेखील अनिताने मला सगळं सांगितले आहे.’’

निशाला आपल्या वागण्याबद्दल अपराधी वाटू लागले. ती पलंगावर झोपून अनिता नेमकी केव्हा येते याची वाट पाहू लागली. अनिताविषयी आपण उगीचच का गैरसमज करून घेतला?’’ या गोष्टीचा तिला पश्चाताप वाटू लागला.

A Lession From Grandma 13-12-2019.indd 9 13-12-2019 15:32:33



nbt.india
एकः सूते सकलम्

दुसऱ्या दिवशी अनिता आली, पण ती आजीच्या खोलीत जाऊन बसली.

"हे देवा!" अनिता संतापाने चीड व्यक्त करून एखाद्या रागावलेल्या सर्पाप्रमाणे फुत्कारून आजीला म्हणाली, "तू जर मला फक्त एकदा जरी सांगितले असते, की निशा येथे आहे तर मी मुळीच आले नसते." आजी हसून म्हणाली, "मला हे समजत नाही, तुम्ही दोघी बहिणी का भांडता? निशाला तर तुझ्या कामगिरीबद्दल किती अभिमान वाटतो. तुझ्या प्रत्येक चित्रकला स्पर्धेतील बक्षिसांबद्दल मला तिने आवर्जून सांगितले आहे."

A Lession From Grandma 13-12-2019.indd 10 13-12-2019 15:32:33

अनिताने आ वासून नवलाईने विचारले, ‘‘खरंच तिने सांगितले?’’ तिला हे सर्व ऐकूनच खरं तर धक्का बसला होता. आजी म्हणाली, ‘‘तिला असे वाटते की, तू चित्रकलेत जेवढी उंची गाठली आहे तेवढी अद्यापही आपल्याला लेखनात मात्र गाठता आलेली नाही.’’

अनिता बेचैन झाली. तिने आजीला विचारले, ‘‘अगं! निशा कोठे आहे? मला तिला ताबडतोब भेटायलाच हवे.’’

अत्यंत उतावीळपणे अनिता शेजारी लागून असलेल्या खोलीत गेली. तेथे निशा लघुकथा लिहित होती. अनिता सावकाश व शांतपणे निशाच्या मागे उभी राहून ती काय लिहित आहे ते वाचू लागली.

अनिता आपली कथा वाचत असल्याची निशाला अजिबातच जाणीव नव्हती.



nbt.india
एकः सूतं सकलम्



अनिताबद्दलची स्तुती आणि तिच्या कलेच्या संस्मरणीय प्रगतीबाबत निशा सारे काही लिहित होती.

निशाने मागे उभ्या असलेल्या अनिताची सावली पाहिली. तिने तात्काळ पलंगावरून उडी मारून अनिताकडे झेप घेतली आणि तिला दीर्घ आलिंगन दिले. दोघींच्या डोळ्यांतून आनंदाश्रू ओघळले. त्यांनी एकमेकींची माफी मागितली.

निशा म्हणाली, ‘‘अनिता तुझी मी आभारी आहे की तू माझ्याबद्दल आजीशी खूप चांगले बोललीस.’’ त्यावर अनिता विनम्रपणे उत्तरली, ‘‘तू तर माझें गगनभरारी घेतल्यासारखे कौतुक केलेस. खरं तर तू माझ्यापेक्षाही अधिक गुणवान आहेस.’’

nbt.india
एकः सूते सकलम्

दृढ आलिंगन विलग झाल्यावर
त्यांनी आजीच्या गळ्यात हात गुंफले.
दोघींनी आजीच्या गालांचे चुंबन घेतले.
अनिता अडखळतंच बोलली,
“अगं आजी, तू... तू... हे सर्व...!”
निशा एकदम म्हणाली, “अस्सं!
आजी तूच यामागे होतीस तर!”



nbt.india
एकः सूते सकलम्

A Lession From Grandma 13-12-2019.indd 13 13-12-2019 15:32:35



nbt.india
एकः सूते सकलम

त्यावर आजी म्हणाली, ''मला तुमच्या दोघींचा सारखाच अभिमान वाटतो. तुम्ही तुमच्या अंतःकरणापासून एकमेकींच्या कलागुणांची भविष्यातही प्रशंसा केल्यास मला अधिक अभिमान वाटेल.''

दोघींनी आपली मान लाजेने खाली घातली.

निशा म्हणाली, ‘‘अगं आजी, आता तरी कृपा करून सांगशील? तुला आमच्या यशाबद्दल कसे कळले?’’

आजी अभिमानाने म्हणाली, ‘‘हे पहा, मला कौतुक कराव्या अशा मुली आहेत की! अनिताच्या आईने मला फोनवर सांगितले की निशाच्या यशाबद्दल ती किती आनंदी होती आणि निशाच्या आईने तर पूर्ण पानभर पत्र लिहून अनिताच्या कलेची खूप स्तुती केली.’’

अनिता दीर्घ श्वास घेऊन कुजबुजली, ‘‘मी किती मूर्ख होते.’’

निशा स्वतःलाच म्हणाली, ‘‘अनिताच्या महत्त्वपूर्ण यशाकडे मी दुर्लक्ष का केले?’’



nbt.india
एकः सूते सकलम्



nbt.india
एकः सूते सकलम्

आजी आनंदाने म्हणाली, ''हे नेहमीच लक्षात ठेवा की, दुसऱ्याच्या यशाबद्दल नेहमीच आदर ठेवला पाहिजे. त्यामुळे तुमच्या स्वतःच्या कलेतील गुणवत्ता तुम्हाला स्वतःलाच समजेल.''

आजीने अनिता आणि निशाला उत्कृष्ट धडा केवळ शिकवला नाही तर तिने या दोन्ही बहिणींमधील गैरसमज दूर करून त्यांना एकमेकींच्या जवळ आणले.



nbt.india
एकः सूते सकलम्

Lasertypeset by Mac Script, Pune and
printed at Educational Stores, Ghaziabad (U.P.)

दोघा मावस बहिणींना गुणग्राहकता आणि निष्कपटवृत्ती शिकवित आणि उभयतांत उत्तम समेट घडवून आणण्याच्या आजीच्या भूमिकेची ही चित्तवेधक कथा.

**देबाशिष मजुमदार** हे बाल साहित्यातील प्रसिद्ध लेखक आहेत. त्यांच्या बालकथा या अग्रगण्य राष्ट्रीय वृत्तपत्रांमधून आणि लहान मुलांच्या नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाल्या आहेत. जगप्रसिद्ध *चिकन सूप फॉर दि सोल* या मालिकेत त्यांचे लेखन प्रसिद्ध झाले आहे. २००३ मध्ये त्यांच्या *कमला* या लघुकथेला ‘कॉमनवेल्थ शॉर्ट स्टोरी पारितोषिक’ प्राप्त झाले आहे.

**अलय घोषाल** हे मुक्त रेखाटनकार, सल्लागार आणि कला-रचनाकार आहेत. त्यांनी *बर्तमान* या वृत्तपत्रासाठी कला-संचालकपदी कार्य केले आहे.



nbt.india
एकः सूते सकलम्

nbt.india
एकः सूते सकलम्
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

₹ 40.00
ISBN 812379012-0
9 788123 790121
19201689
A Lession from Grandma *(Marathi)*

# आजीचा धडा

देबाशीष मजुमदार

रेखाचित्रे : अलय घोषाल

अनुवाद : निवेदिता मदाने वैशंपायन



nbt.india
एकः सूते सकलम्

A Lession From Grandma 13-12-2019.indd 19 13-12-2019 15:32:39